## प्रेसनोट

जा.क्र. १५७ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस उप अधिक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक :— २७/०३/२०१८

### ''अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीस चार वर्ष सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा''

पोलीस ठाणे दिघोरी अंतर्गत ग्राम जैतपुर येथिल अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपी नामे राजु अंबादस मेहंदळे, वय २५ वर्ष, रा. जैतपुर ता. लाखांदुर, जिल्हा भंडारा यास आज दिनांक २७.०३.२०१८ रोजी विशेष जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा चे प्रमुख सत्र न्यायाधिश श्री. संजय आ. देशमुख सा. यांनी आरोपी विरूध्द विनयभंगाचे गुन्हयात दोषसिध्द झाल्याने चार वर्ष सश्रम कारावास व ५५००/— रूपये द्रव्यंडाची शिक्षा सुनावली.

याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक ९.०२.२०१४ ला रात्री ७.३० वा. दरम्यान गुन्हयातील पिडित अल्पवयीन मुलगी जैतपुर येथे आजोबाचे घरा समोरील छपरीमध्ये पलंगावर वाकर अंथरून टाकत असता ग्राम जैतपुर येथिल आरोपी नामे राजु अंबादस मेहंदळे हा घराचे मागील सांधोळीतुन छपरीत येवुन पिडितेस मागेहुन दोन्ही हाताने कवाटाळुन अंगाला बिलगंला व तोंड दाबण्याचा प्रयत्न केला असता पिडित जोरात ओरडली,_ तिच्या ओरडण्याचा आवाज ऐकुण पिडितेचा मामा व इतर नातेवाईक तात्काळ घटणास्थळी आले आणि आरोपीचे ताब्यातुन पिडितेला सोडविले व पोलीस ठाणे दिघोरी येथे समक्ष हजर येवुन घटणेबाबत पहिली खबर दिली.

सदर खबरेवरून पो.हवा. शामराव चाचेरे, ब.नं. ७७५ यांनी पिडित मुलीचे तक्रारीवरून आरोपी विरूध्द अपराध क्र. ७/१४ कलम ४४८, ३५४ (अ)(१) भादवि अन्वये गुन्हा नोंद केला.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस हवालदार, टोलीराम सार्वे, ब.नं. ६७४ यांनी करून गुन्हयातील **आरोपी नामे राजु अंबादस मेहंदळे, वय २५ वर्ष, रा. जैतपुर ता. लाखांदुर, जिल्हा भंडारा यास** अटक करून गुन्हयाचा तपास केला. तपासात आरोपी विरूध्द पुरावे प्राप्त झाल्याने आरोपी विरूध्द गुन्हयात कलम ४४८, ३५४ (अ)(१) भादवि सहकलम ८ लैगीक अपराधापासुन

बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ अन्वये आरोप पत्र तयार करून विशेष सत्र न्यायालय, भंडारा येथे दाखल केले. सदर आरोपपत्रास केस क्र. ११/१४ अन्यवे प्रमुख न्यायाधिश सा. यांचे समक्ष सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी **मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश श्री. संजय आ. देशमुख सा.** यांचे समक्ष चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट श्री प्रमोद के. भुजाडे, सहा. सरकारी अभियोक्ता**, सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. आज दिनांक २७.०३.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन **आरोपी नामे राजु अंबादस मेहंदळे, वय २५ वर्ष, रा. जैतपुर ता. लाखांदुर, जिल्हा भंडारा** यांचे विरूध्द दोषसिध्द झाल्याने **कलम ४४८ भादवि अन्वये ३ महिणे सश्रम कारावास व ५००/-- रूपये दंड, दंड न भरल्यास १ महिणा कारावास व कलम ८ लैगीक अपराधापासुन बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ अन्वये ४ वर्ष सश्रम कारावास व ५०००/-- रूपये दंड, दंड न भरल्यास ३ महिणे कारावास, सदर द्रव्य दंडाचे रकमे पैकी ५०००/-- रूपये पिडितेला नुकसान भरपाई म्हणुन देण्याचे आदेश दिले.** सदर गुन्हयात सहा. पोलीस निरीक्षक, बबन आर. पुसाटे, ठाणेदार पोलीस ठाणे दिघोरी यांचे मार्गदर्शनात पो.शि. अजित वाहने/१२०९ पो.स्टे. दिघोरी यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

**महाराष्ट्र पोलीस दल, जिल्हा भंडारा तसेच सरकारी अभियोक्ता वर्ग जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा तर्फे जनतेस निर्भीड पणे गुन्हयाचे दोषसिध्दी करीता व महिलांवरील अत्याचार रोखण्याकरीता पोलीसांना पंच व साक्षदार म्हणुन सहकार्य करण्याचे जाहिर आवाहन करण्यात येंत आहे.**

(एस. आर. तेलुरे)
जि.वि.शा.भंडारा
दुरध्वनी क्र.९९२१२५३५४९

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.